# नगरमध्ये गुंडगिरी, काहीही करा यांना घालवा

## आ. पाटील यांचा आ. जगताप यांच्यावर निशाणा; राष्ट्रवादीची नगरमध्ये सभा

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – नगरमध्ये वाढत्या दादागिरी, गुंडगिरी, ताबामारीमुळे जनता त्रस्त आहे. काहीही करा यांना घालवा, असे नागरिक म्हणत आहेत. बलाढ्य विखेंना पाडून लंके निवडून येऊ शकतात. तर आपल काय अशी भीती नगरमधील लोकप्रतिनिधींना वाटायला लागलीय. त्यामुळेच जुना विश्वास आता जागा झालाय. जुन्या विश्वासाचा किती वेळा धावा करायचा. नवा विश्वास आहे की नाही. नवा विश्वास समोर आणण्याचे काम करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी शुक्रवारी येथे सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिवस्वराज्य यात्रेची सभा काल, शुक्रवारी येथील नंदनवन लॉन्समध्ये झाली. यावेळी झालेल्या भाषणात नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांचे नाव न घेता त्यांच्यावर आ. पाटील यांनी जोरदार टीका केली. दरम्यान सभेपूर्वी नगर शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्या नेतृत्वाखाली बालिकाश्रम रस्ता-भूतकरवाडी येथून रॅली काढण्यात आली. नंदनवन लॉन्स येथील सभेस खा. डॉ. अमोल कोल्हे, खा. निलेश लंके, पक्ष निरीक्षक अंकुश काकडे, युवक अध्यक्ष मेहबूब शेख, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, माजी आमदार दादा कळमकर, शौकत तांबोळी,




डॉ. अनिल आठरे, सुनील गव्हाणे, कराळे मास्तर आदी उपस्थित होते. शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.

**विश्वास जुना...**

जाहिरातबाजीवर बोलताना आ. पाटील म्हणाले, नगर शहरात गुंडगिरी व ताबेमारी वाढली आहे. काही व्यापारी मला भेटले, तेही सुरक्षित नाहीत. अशा स्थितीत रोज सकाळी विश्वास जुना...कशाला करता? आमची राष्ट्रवादी सत्तेवर आल्यावर तुम्हाला नवा विश्वास आम्ही देऊ, असे स्पष्ट करून ते म्हणाले, त्यांना भीती आहे की, विखेंसारखा नेत्याचा पराभव होऊ शकतो, तर आपले काय?. म्हणून त्यांचा सारा खटाटोप सुरू आहे, मात्र नगरची जनता सूज्ञ आहे. लोकसभेला त्यांनी बलाढ्य शक्तीचा पराभव केला. जनशक्तीने धनशक्तीचा पराभव केला व खा. लंके यांना निवडून आणले. हेच आता विधानसभेत करायचे आहे. महाविकास आघाडीचे जागा वाटप झाले नसल्याने आज उमेदवारी जाहीर करू शकत नाही. पण महाविकास आघाडीतील तीनही घटक पक्षांच्या स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनी आपल्यात स्पर्धा करू नये. महाविकास आघाडी म्हणूनच संघटित ताकद निर्माण करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

### ‘त्या’ पावसाला बळी पडू नका

- १० ते १२ ऑक्टोबरला आचारसंहिता जाहीर होईल. १२ नोव्हेंबरला मतदान होण्याची शक्यता आहे. त्या काळात जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्या पावसाला बळी पडू नका. लोकसभेलाही जास्त पाऊस झाला मात्र, तुम्ही पावसाला बळी पडला नाहीत. हीच भूमिका आताही घ्यायची आहे. दरम्यान, सत्ताधारी मत विभाजनासाठी तिसऱ्या आघाडीला बळ देत आहेत. मात्र, त्यांचा डाव सपशेल फेल ठरणार आहे, अशीही टीका जयंत पाटील यांनी केली.

# जिल्हा बँकेला ५८.७४ कोटींचा नफा

## सर्वसाधारण सभा : भागधारकांना १० टक्क्याप्रमाणे लाभांशाची शिफारस

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – जिल्हा बँकेस २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात ५८.७४ कोटी नफा झाला असून संचालक मंडळाने भागधारकांना १० टक्क्याप्रमाणे लाभांश देण्यासाठी रक्कम रूपये ३४.२५ कोटी शिफारस केली असल्याची माहिती बँकेचे चेअरमन शिवाजी कर्डिले यांनी दिली.

जिल्हा बँकेची ६७ वार्षिक सर्वसाधरण सभा शुक्रवारी जिल्हा बँकेच्या सभागृहात पार पडली. यावेळी चेअरमन कर्डिले यांनी याबाबत माहिती दिली. बँकेला ३१ मार्च २०२४ अखेर सर्व प्रकारच्या कर्ज येणे बाकी ७ हजार २५०.६२ कोटी आहे. यात अल्प मुदत पिक कर्ज ३ हजार ४८.३३ कोटी, मध्यम मुदत कर्ज १ हजार ८१.५१ कोटी, दीर्घ मुदत कर्ज १२३.३६ कोटी, सर्व प्रकारची कॅश क्रेडीट कर्ज (साखर कारखाने), तसेच पगारदार पतसंस्था व वैयक्तिक कर्ज २ हजार ९६०.६२ कोटी आणि अवसायानातील संस्था ३६.८० कोटी असे एकूण कर्जाचा समावेश आहे. बँकेला अहवाल सालात अल्पमुदत पीक कर्ज रक्कम ३ हजार ५३.६५ कोटी व पशुपालन खेळते भांडवलासाठी रुपये ३०३.६८ कोटीचे वाटप केले असून अल्प मुदत कर्जाची ३१ मार्चअखेर ३ हजार ४८.३३ कोटी येणेबाकी आहे. तसेच सहकारी साखर कारखाने, पाईपलाईन्स, ठिबक सिंचन शेळीमेंढी पालन, हार्वेस्टर, डेअरी डेव्हलपमेंट, संकरीत गाई, बैल खरेदी इ. करीता रुपये २३५.७१ कोटीचे कर्जवाटप केले आहे. मार्चअखेर या कर्ज खात्यास १ हजार ८१.५१ कोटी येणे बाकी आहे. तसेच ट्रॅक्टर्स, घरकुल, गोडावून, शैक्षणिक कर्ज व शेततळे आदींसाठी दीर्घ मुदत कर्जवाटप केलेले आहे. या कर्ज यातील मार्चअखेर १२३.३६ कोटी येणेबाकी आहे. तसेच अवसायनातील ३२ संस्थांकडील कर्ज येणेबाकी ३६.८० कोटी आहे. विविध कार्यकारी सेवा संस्थांच्या कर्जदार सभासदांनी मध्यम मुदत व दीर्घ मुदत कर्जाची नियमित परतफेड केल्यास १ टक्के व्याजदर सवलत. सहकारी साखर कारखाने बँकेने खेळते भांडवली कर्जपुरवठा करत असलेल्या व नियमित परतफेड करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांना सर्व कर्जावर (सवलतीच्या दरातील कर्ज सोडून व एनपीए झालेली कर्ज खाती सोडून) १ टक्के व्याजदर सवलत. पगारदार नोकर संस्था नियमित कर्ज परतफेड करत असणारे व थकबाकी नसणाऱ्या संस्थांना १ टक्के व्याजदर सवलत. खरेदी विक्री सहकारी संघ, जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था व सहकारी दूध संघ-नियमित कर्ज परतफेड करत असणारे व थकबाकी नसणाऱ्या संस्थांना १ टक्के व्याजदर सवलत. बचत गट नियामित कर्जपरतफेड करणाऱ्या पीएलएलएमए व्याजदर सवलत बँकेच्यावतीने देण्यात येत आहे. कर्जवसुली व एनपीए बँकेची गतवर्षी मार्चअखेर (२०२३) ६५ टक्के वसुली होती. यंदा ती ५८.३४ टक्के आहे. यंदा बँकेची एनपीए रक्कम रुपये ३११.९ कोटी असून त्यापोटी बँकेने रूपये ६७१.८२ कोटींची तरतूद केलेली आहे. बँकेचे ढोबळ एनपीएचे प्रमाण ४.२९ टक्के आहे. गतवर्षी हे प्रमाण ४.५३ टक्के होते. बँकेच्या खातेदारांना बँकींग व विमा सुविधा एकाच खिडकीतून उपलब्ध करून देण्यासाठी बँकेने एचडीएफसी लाईफ इन्शुरन्स, रिलायन्स निप्पॉन लाईफ इन्शुरन्स कंपनी व श्रीराम जनरल इन्शुरन्स या कंपन्यांची कार्पोरेट एजन्सी घेतलेली आहे.

### सचिवांसाठी अंशदान व मेडीक्लेम

- बँकेने विविध कार्यकारी सेवा संस्थांच्या सचिवांकरिता पगार व बोनसपोटी अहवाल सालात रक्कम रुपये २ कोटी ५० लाख अंशदानापोटी देण्यात आली आहे व मेडीक्लेमसाठी रक्कम रुपये १४ लाख देण्यात आली आहे.

# शेतात कुजलेल्या अवस्थेत आढळला तरुणाचा मृतदेह

## मनमाड महामार्गालगत देहरे शिवारातील घटना

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – नगर- मनमाड महामार्गालगत देहरे (ता. नगर) येथील टोलनाक्याजवळील एका शेतात अंदाजे ३५ वर्ष वयाच्या तरुणाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह काल, शुक्रवारी सकाळी आढळून आला आहे. मृतदेहाची ओळख पटलेली नसून पोलिसांनी सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केला आहे.

देहरे टोलनाक्याजवळ दादा दामोधर करंडे यांच्या शेतात हा अनोळखी मृतदेह सकाळी नऊच्या सुमारास आढळून आला. या परिसरात शेती असलेले कचरू गणपत करंडे हे शेतकरी सकाळी त्यांच्या शेतात फेरफटका मारण्यासाठी जात असताना दादा करंडे यांच्या शेतात सोयाबीनच्या पिकात पडलेला मृतदेह त्यांना दिसून आला. ही माहिती त्यांनी पोलीस पाटील चंद्रकांत खजिनदार यांना सांगितली. खजिनदार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत एमआयडीसी पोलिसांना ही माहिती कळविली.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, पोलीस उपनिरीक्षक मोंढवे, पोलीस अंमलदार भास्कर मिसाळ यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी जावून पाहणी केली. त्यानंतर रुग्णवाहिका बोलावून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृतदेहाची ओळख पटविण्याचा प्रयत्न पोलिसांनी सुरू केला असून या वयाचा कोणी तरूण बेपत्ता झाल्याची नोंद नगर जिल्ह्यातील कुठल्या पोलीस ठाण्यात दाखल आहे का?याचा शोध घेतला जात आहे. मृतदेहाची ओळख पटल्यावरच हा घातपात आहे की अन्य काही याबाबत माहिती मिळू शकणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# तरूणाला शिवीगाळ करत धारदार हत्याराने मारहाण

## भाजप पदाधिकाऱ्यासह आठ जणांविरुध्द ॲट्रोसिटीचा गुन्हा

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – वेल्डिंगचे काम करण्यासाठी गेलेल्या तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करून लाकडी दांडके, लोखंडी रॉड व धारदार हत्याराने मारहाण केल्याची घटना केडगाव लिंक रस्त्यावर ९ सप्टेंबर रोजी रात्री नऊ ते साडेनऊच्या दरम्यान घडली. रणजीत देवराम वैरागर (वय ३९ रा. लालटाकी, बारस्कर कॉलनी) असे जखमीचे नाव आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. त्यांनी उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरून गुरूवारी (२६ सप्टेंबर) भाजप पदाधिकारी नीलेश सातपुते सह आठ जणांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नीलेश सातपुते, राजेंद्र सातपुते, निखील सातपुते, महादेव सातपुते, अर्चना सातपुते, सुनीता सातपुते, गणेश कोतकर व नांगरे (पूर्ण नाव माहीत नाही, सर्व रा. केडगाव) यांच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी वैरागर हे नगरसेवक विजू पठारे यांच्या ऑफीसवर वेल्डींगच्या कामासाठी गेले होते. फिर्यादी वेल्डींगचे काम करत असताना संशयित आरोपी लाकडी दांडके, लोखंडी रॉड, धारदार हत्यार घेऊन आले. ‘तू इथे कोणाला विचारून काम चालू केले, तुझे नाव काय आहे, असे विचारले असता फिर्यादीने मी नगरसेवक विजू पठारे यांच्याकडे काम चालू केल्याचे सांगितले. त्यानंतर संशयित आरोपीने फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ केली. ‘तुम्ही मला शिवीगाळ का करता, जे काही असेल ते मालक पठारे यांना सांगा’, असे फिर्यादीने सांगताच संशयित आरोपींनी फिर्यादीला मारहाण केली. जातीवाचक शिवीगाळ करून धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस उपअधीक्षक अमोल भारती करत आहेत. दरम्यान, या घटनेत यापूर्वी सातपुते यांच्या फिर्यादीवरून विजय पठारे व इतरांवर गुन्हा दाखल झालेला आहे. घटनेनंतर १७ दिवसांनी विरोधी गटाची फिर्याद दाखल झाली आहे.

# नगरमधून दोन अल्पवयीन मुलींना पळविले

## कोतवाली, एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील घटना

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – शहर व उपनगरातून दोन अल्पवयीन मुलींना अज्ञात व्यक्तींनी फूस लावून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. पीडित अल्पवयीन मुलींच्या नातेवाईकांनी या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात




व्यक्तींविरूध्द संबंधीत पोलीस ठाण्यात अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

रेल्वे स्टेशन रस्ता परिसरात राहणाऱ्या रिक्षा चालकाने गुरूवारी (२६ सप्टेंबर) कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांची अल्पवयीन मुलगी (वय १५) गुरूवारी सकाळी ११ वाजता शाळेत जाण्यासाठी घराबाहेर पडली. दरम्यान दुपारी एकपर्यंत ती शाळेतून घरी आली नसल्याने फिर्यादी यांनी तिचा नातेवाईकांकडे शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. त्यांनी रात्री ११ वाजता कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीस मुलीचा शोध घेत आहेत.

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला (वय १४) अज्ञात व्यक्तीने आमिष दाखवून बुधवारी (२५ सप्टेंबर) दुपारी दोन ते रात्री आठच्या दरम्यान पळवून नेले. सदरचा प्रकार फिर्यादीच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला असता ती मिळून आली नाही. फिर्यादी यांनी दुसऱ्या दिवशी गुरूवारी (२६ सप्टेंबर) सकाळी एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेत घटना सांगितली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस मुलीचा शोध घेत आहेत.

# ३० हजार थकबाकीदारांना महावितरणकडून तडजोडीची संधी

## राष्ट्रीय लोकअदालतमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – वीज बिल थकल्यामुळे मार्च २०२४ पूर्वी कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या जिल्ह्यातील ३० हजार ८८५ वीज ग्राहकांच्या प्रकरणांचा निपटारा तडजोडीच्या माध्यमातून लोकअदालतमध्ये आज (शनिवार) करण्यात येणार आहे, अशी माहिती अधीक्षक अभियंता रमेश पवार यांनी दिली.

दरम्यान, जिल्हा तथा तालुका विधी सेवा प्राधिकरणाकडून आयोजित लोकअदालतमध्ये दाखलपूर्व असलेली आणि कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेली ३० हजार ८८५ प्रकरणे ५१ कोटी ३४ लाख रुपयाच्या तडजोडीसाठी महावितरणने ठेवली आहेत. जिल्ह्यात होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये सहभाग नोंदवून तडजोडीने वाद मिटवावा आणि महावितरणच्या व्याज आणि विलंब आकाराच्या माफीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही अधीक्षक अभियंता पवार यांनी केले आहे. राष्ट्रीय लोक अदालतीत सहभाग नोंदविणाऱ्या महावितरणच्या लघुदाब आणि उच्चदाब ग्राहकांना महावितरण अभय योजना २०२४ च्या सर्व सवलती लागू राहणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने १०० टक्के मुद्दल रक्कम भरणाऱ्या थकबाकीदार ग्राहकांना व्याज आणि विलंब आकाराची माफी मिळणार आहे. सोबत वीजपुरवठा खंडित करण्यात आलेल्या तारखेपासून तर अर्जाच्या तारखेपर्यंत कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. याशिवाय थकबाकीदार ग्राहकांने मुद्दल रक्कम एकरकमी भरल्यास उच्चदाब वर्गवारीतील ग्राहकांना ५ टक्के आणि लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांना १० टक्के अतिरिक्त सवलतीचे प्रावधान आहे. याशिवाय ३० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित मुद्दल थकबाकी ६ हप्त्यांत भरण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### तीन लाख ग्राहकांकडे ३७७ कोटींची थकबाकी

- नगर जिल्ह्यात तीन लाख ग्राहकांकडे ३७७ कोटी ३९ लाख रुपये थकबाकी असून थकबाकीदार ग्राहकांचा नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे. वीजबिलाचा भरणा करणे अधिक सुलभ व्हावे, यासाठी शनिवार व रविवारी २८ व २९ सप्टेंबर २०२४ या साप्ताहिक सुटीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरू असणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील महावितरणचे सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्र सुरू राहणार असून या सुविधेसह डिजिटल माध्यमातून ग्राहकांनी आपल्या चालू व थकीत वीजबिलाचा भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.

# मित्र-मैत्रिणींसोबत गेलेल्या मुलीचा पाण्यात बुडून मृत्यू

## विळद शिवारातील धबधब्यावर घडली घटना

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – मित्र-मैत्रिणींसोबत विळद (ता. नगर) शिवारातील गवळीवाडा धबधब्यावर गेलेल्या अल्पवयीन मुलीचा (वय १७) पाण्यात पडून बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. समीक्षा लाला कुसमुडे (वय १७ रा. नवनागापूर) असे मयत अल्पवयीन मुलीचे नाव आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

समीक्षा ही गुरूवारी (२६ सप्टेंबर) दुपारी तिच्या तीन ते चार मित्र- मैत्रिणींसोबत विळद शिवारातील गवळीवाडा धबधब्यावर फिरण्यासाठी गेली होती. ते सर्वजण धबधब्याजवळ असताना समीक्षा एका मोठ्या दगडावर चढली मात्र त्या दगडावर शेवाळ असल्याने तिचा पाय घसरला ती खोल पाण्यात पडली व त्यात तिचा बुडून मृत्यू झाला. सदरची घटना तिच्या सोबतच्या मित्र- मैत्रिणींनी तिच्या घरी सांगितली. मुलीचा शोध घेतला परंतु पाणी जास्त असल्याने ती मिळून आली नाही. नातेवाईकांनी एमआयडीसी पोलिसांना काल, शुक्रवारी सकाळी माहिती दिली. सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी व पथकाने घटनास्थळी धाव घेतली असता समीक्षाचा मृतदेह मिळून आला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# महत्वाचे

## घरात घुसून माय- लेकाला मारहाण

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – बळजबरीने घरात घुसून तिघांनी माय-लेकाला मारहाण केल्याची घटना गुरूवारी (२६ सप्टेंबर) सायंकाळी सहाच्या सुमारास केडगाव उपनगरातील एकता कॉलनीत घडली. याप्रकरणी माया हिरामन डंबाळे (वय ५७ रा. एकता कॉलनी, केडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तिघा अज्ञात व्यक्तींविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरूवारी सायंकाळी सहाच्या सुमारास तीन अनोळखी व्यक्ती दुचाकीवरून फिर्यादीच्या घरी आल्या. अमोल गायकवाड याने त्याच्या मुलांना घ्यायला पाठविले आहे, असे बोलून दोघे गेटच्या आत आले व त्यांनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. बळजबरीने घरात घुसून मुलाला मारहाण केली. अमोलविरूध्द दिलेली केस मागे घे नाही तर तुम्हा सगळ्यांना जीवे मारून टाकीन, अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस अंमलदार संदीप साठे करत आहेत.

## शहर जिल्हाध्यक्षपदी खामकर

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) ओबीसी विभागाच्या अहमदनगर शहर जिल्हाध्यक्षपदी अमित खामकर यांची फेर निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छत्रपती संभाजीनगर येथील ओबीसी विभागाच्या विचार मंथन शिबिरात खामकर यांना दिले. याप्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, आमदार सतीश चव्हाण आदी उपस्थित होते. खामकर यांनी ओबीसी विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष म्हणून विविध सामाजिक, शैक्षणिक कामातून वेगळा ठसा उमटवला आहे. समाजातील गोरगरीब, गरजू तसेच अडीअडचणीच्यावेळी सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारा कार्यकर्ता म्हणून खामकर यांची ओळख आहे. तरूणाईचे मोठे संघटन त्यांनी उभे केले आहे. खामकर यांच्या या जमेच्या बाजू आहेत. ते प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होतात. त्यांची काम करण्याची वेगळी हातोटी आहे. या त्यांच्या अष्टपैलू कामाची दखल घेत व फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते खामकर यांची ओबीसी विभागाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे.

## चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – लायन्स क्लब ऑफ अहमदनगर प्राईड, लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लबच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कलर्स ऑफ प्राईड या चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये काम्या वर्मा, ओजस वैकर, आर्या निंबाळकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविले. नुकतेच झालेल्या या चित्रकला स्पर्धेत शहर व उपनगरातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी कलर्स ऑफ प्राईड या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेचे हे सहावे वर्ष होते. ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली. पहिला गट एलकेजी ते पहिली दुसर गट दुसरी ते पाचवी तिसरा गट सहावी ते दहावी, त्यांना अनुक्रमे रेखाटलेल्या चित्रात रंग भरणे, नैसर्गिक देखावा किंवा सण-उत्सव, जागतिक शांतता किंवा सक्षम भारत हे विषय स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात आले होते. तसेच विशेष गटात झालेल्या स्पर्धेत स्नेहालय, बालभवन, मुकबधीर व दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश होता. विशेष गटात सार्थक हरारे, सोहम औराडे व अशोक दरंदले यांनी प्रथम क्रमांक मिळवले आहे.

## अनुकंपाधारक उमेदवारांचे उपोषण

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – शिक्षक दरबारात आठ दिवसात नियुक्तीचे आदेश देण्याचे आश्वासन देऊनही संस्थेकडे प्रस्ताव फेटाळून लावण्यात आल्याने अनुकंपा धारक शिपाई पदासाठी असलेल्या उमेदवारांनी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागासमोर मुलाबाळांसह उपोषण सुरू केले आहे. घरातील कर्ता पुरूष गेल्यानंतर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न बिकट बनला असताना, नियुक्तीसाठी सुरू असलेली टोलवाटोलवी थांबवून मान्यता देण्याची मागणी उपोषणकर्ते अनुकंपाधारक लाभार्थींनी केली आहे. या उपोषणात शासुंदर शेळके, अविनाश अमृते, आकांक्षा शेलार, पुनम शिंदे, केतन जमधडे, गौरव साळवे आदी अनुकंपाधारक शिपाई वर्ग सहभागी झाले होते. या उपोषणस्थळी माध्यमिक शिक्षक सोसायटीचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे यांनी भेट देऊन पाठिंबा दिला. सर्व अनुकंपा धारक शिपाई यांचे माध्यमिक शिक्षक विभागाकडे ९ महिन्यांपासून प्रस्ताव प्रलंबित आहे. शिक्षण अधिकारी यांना वारंवार विनंती करुन, स्मरणपत्र दिलेले आहेत. तरी शिक्षण अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कुठल्याही प्रकारची कारवाई केलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## मुख्याध्यापक शेख यांना पुरस्कार

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्यावतीने भोयरे पठार (ता. नगर) येथील भाग्योदय विद्यालयाचे मुख्याध्यापक हबीब चाँद शेख यांना मौलाना आझाद आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. २९ सप्टेंबर रोजी सावंतवाडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याहस्ते शेख यांना सन्मानित केले जाणार आहे. हबीब शेख अनेक वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहेत. शैक्षणिक कार्यातून भावी पिढी घडविण्याचे कार्य ते करत आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात योगदान देऊन गरजू घटकातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम ते सातत्याने करत आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्यावतीने स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या नावाने पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या शिक्षण परिषदेमध्ये शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आकाश तांबे यांनी दिली आहे.

## जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे यांचे स्वागत

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – येथील जिल्हा न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी पदभार स्विकारला असता, त्यांचे कौटुंबिक न्यायालय वकील संघातर्फे स्वागत करून सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष ॲड. सुरेश लगड, कार्याध्यक्ष ॲड. शिवाजी सांगळे, सचिव ॲड. राजेश कावरे, महिला सचिव ॲड. अनिता दिघे, लॉयर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन ॲड. भूषण बऱ्हाटे, संचालक ॲड. संदीप काळे, ॲड. वृषाली तांदळे, ॲड. चंदन बारटक्के, ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. संजय पाटील, ॲड. बी. आर. म्हस्के आदी उपस्थित होते. उपस्थित वकीलांनी प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देऊन, वकील संघाच्यावतीने सहकार्याची भावना व्यक्त केली. प्रास्ताविकात ॲड. कचरे यांनी कौटुंबिक न्यायालय वकील संघाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. राजेश कावरे यांनी केले. आभार ॲड. शिवाजी सांगळे यांनी मानले.